http://www.loksatta.com/daily/20030709/editor.htm

# न्यायाचीच होळी!

बडोद्याच्या झहिरुन्निसा ऊर्फ झहिराला हवा आहे न्याय! ‘कांपते कांपते झूठ बोला था कोर्ट में,‘ असे दोनच दिवसांपूर्वी ‘इंडियन एक्स्प्रेस‘ला सांगणाऱ्या आपल्या आईपाठोपाठ झहिराने या देशातल्या न्यायव्यवस्थेचे वस्त्रहरण केले आहे. गोध्रा हत्याकांडानंतर गुजरातेत अहमदाबाद, बडोदे आणि अन्य ठिकाणी दंगली उसळल्या. गेल्या वर्षी हे सगळे घडत असताना गुजरातचे भारतीय जनता पक्षाचे नरेंद्र मोदी यांचे खुनशी सरकार उघड्या डोळ्यांनी या जागोजाग पेटलेल्या होळ्या नुसते पाहत होते असे नाही, तर त्यात तेल ओतायचे त्यांचे धंदे चालू होते. त्या वेळी १ मार्च रोजी बडोद्यातल्या ‘बेस्ट बेकरी‘ला आग लावून १४ जणांची जिवंतपणी राखरांगोळी करणारे अधम गेल्या महिन्याच्या २७ तारखेला निर्दोष सुटले. झहिराचे वडील आणि जवळचे आठ नातलग त्या चौदाजणांमध्ये होते. झहिरा ही या प्रकरणातली मुख्य साक्षीदार होती आणि तिनेच न्यायालयासमोर, आरोपींना आपण ओळखत नसल्याचे सांगितले. ७३ साक्षीदारांपैकी तिच्यासह ४१ जण उलटल्यानंतर होणार तरी काय, असा प्रश्न कुणाच्याही मनात येईल. पण आता झहिरा बोलते आहे आणि जिवाच्या भीतीने आपल्याला न्यायालयात खोटे बोलणे भाग पडले, असेही ती आता सांगते आहे. तिला ज्यांच्यापासून धोका वाटतो, त्यामध्ये तिने भारतीय जनता पक्षाचे बडोद्याचे आमदार मधू श्रीवास्तव आणि बडोद्याचाच काँग्रेसचा नगरसेवक चंद्रकांत श्रीवास्तव यांची नावे घेतली आहेत. चंद्रकांत हा मधूचा चुलतभाऊ आहे. जो मधू साक्षीच्या काळात तिला न्यायालयात घेऊन आला, तोच आता म्हणतो की मी तिला कधी भेटलोच नाही. चंद्रकांत म्हणतो, ‘मी तिला पैशासह सर्व मदत केली आणि आता ती उलटते म्हणजे तिला वेडच लागले असावे.‘ एकाने पैसे दिले, दुसरा तिला ओळखतही नाही! सध्या गुजरातेत बेशरम मंडळीच सत्तेवर असल्याने कुणाकुणाची बुद्धी नेमकी भ्रष्ट झाली आहे, त्याचा शोधच घ्यायला हवा. ज्यांनी या बेस्ट बेकरी होळीप्रकरणात सर्व २१ आरोपींना सोडून दिले ते बडोद्याचे अतिरिक्त सत्र न्यायाधीश एच. यू. महिदा यांनी आपल्या निकालात इतर गोष्टींचाच अधिक ऊहापोह केला आहे. विन्स्टन चर्चिल यांनी स्वातंत्र्यानंतर भारताचे नेतृत्व दरोडेखोरांच्या हाती जाईल असे म्हटले होते, ते आता खरे ठरले आहे, असे हे न्यायाधीशच आपल्या निकालपत्रात म्हणत आहेत. आपल्या मर्यादांचे भान सुटले की असे होते. झहिराने केलेला स्फोट लक्षात घेता त्यांचे हे मत खरे वाटते. आपल्याच मोहल्ल्यातल्या आरोपींना तिने पोलीस तपासात ओळखलेले असताना ती आपल्या साक्षीत मात्र आपल्याला त्यांची माहिती नसल्याचे सांगते आणि ज्या सरकारी वकिलांनी तिची उलटतपासणी घ्यावयाची ते स्वस्थ बसून राहतात, ही या कायद्याच्या राज्याची शोकांतिका होय. एखाद्या गुन्हेगारीपटात शोभावे तसे नरेंद्र मोदी निकालानंतर आठ दिवस त्यावर चकार शब्दही बोलत नाहीत, याला तरी काय म्हणणार? या खटल्यात सरकारी वकील म्हणून काम पाहणारे रघुवीर पंड्या हे १९९५ मध्ये भारतीय जनता पक्षाच्या पाठिंब्यावर बडोद्याच्या महापालिका निवडणुकीत एका वॉर्डातून उभे होते. त्या वेळी ते सरकारी वकील नव्हते, पण म्हणून आता त्यांचा मूळ रंग तरी कसा लपणार? ते आरोपींच्या वकिलांच्या युक्तिवादालाच ‘मम‘ म्हणायचे काम करत होते. ज्यांनी हा निकाल दिला त्यांना संपूर्ण प्रकरणाचा फेरतपास करायचा आदेश देता आला असता, पण त्यांनीही तो दिला नाही. आता हा खटला नव्याने उभा राहू शकत नाही, असे कायदेतज्ज्ञ म्हणतात, तेव्हा मोदींच्या सरकारमधले एक मंत्री म्हणतात की, सरकारच या संदर्भात वरच्या न्यायालयात अर्ज करू शकते. राष्ट्रीय मानवाधिकार आयोग आणि अल्पसंख्याक आयोग यांनी आवाज उठवताच त्यांना ही बुद्धी झाली. बडोद्याच्या वकिलांनी तर मानवाधिकार आयोगाच्या सदस्यांनी निकालावर भाष्य करून न्यायालयाची बदनामी केल्याबद्दल उच्च न्यायालयात अर्ज दाखल केला, पण तो फेटाळून लावण्यात आल्याने न्यायाची निदान एवढी तरी बूज राखली गेली.

झहिरा आता जे बोलते आहे ते तेव्हापेक्षा वेगळे आहे. गुजरातेत आपल्याला न्याय मिळणार नाही, खटला दुसरीकडे चालायला हवा, असे जेव्हा ती म्हणते तेव्हा तिच्या मनात खदखदणारा कढ लक्षात येतो. ती अवघी १९ वर्षांची आहे.

तिला तिच्या समाजातल्या एकानेही मदत केली नाही. बेस्ट बेकरीच्यासमोर भंगार माल विकणारा लाल महंमद याने, ही बेकरी जळत असताना अनेकांना आरोपींनी वाचवल्याचे न्यायालयात सांगितले. न्यायालयाला तेव्हा त्याला प्रश्न करता आला असता की, ज्यांना वाचवण्यात आले असे तू म्हणतोस ते आहेत कुठे ? झहिराचे वडील दिसत नाहीत, भाऊबंद दिसत नाहीत, त्या ठिकाणी असलेले-प्रत्यक्षात बेपत्ता म्हणून ज्यांचा उल्लेख केला जातो ते-दोघे आहेत तरी कुठे, ते सांग, असेही त्याला उलट विचारता आले असते. न्याय हा असा संगनमताने काम पाहत नसतो, हे त्याला ठणकावून सांगता आले असते. पण तेही सांगितले गेले नाही. जर ही बेकरी आरोपींनी पेटवली नसेल तर मग ती पेटवली तरी कुणी, हे विचारले जाणे गरजेचे होते. परंतु भारतीय जनता पक्षाच्या गुजरातसारख्या दंडेलशाहीच्या राज्यात असे प्रश्न विचारायचे नसतात. डोके चालवायचे नसते, आगी भडकावयाच्या असतात. झहिरा म्हणते, ‘न्यायालयात बजरंग दलाच्या कार्यकर्त्यांच्या उपस्थितीत मला नेमके काय घडले ते सांगता येणे अवघड होते.‘ ती त्या वेळी खोटे बोलली तशी ती आताही खोटेच बोलते आहे, असे घटकाभर मानले तरीही हे प्रकरण पूर्ण चौकशीला पात्र ठरते. नरेंद्र मोदी मख्खपणे हे सर्व पाहत आहेत, पण त्यांच्या पक्षाचे केंद्रातले सरकार आणि एरवी कोणत्याही प्रश्नावर चुरुचुरू बोलणारे अरुण जेटली यांच्यासह सर्व कायदेपंडित चकार शब्दानेही या प्रकरणात बोलत नाहीत, हे गौडबंगाल आहे की कारस्थान ? न्यायाधीशांनी ब्रिटिशांच्या ‘फोडा आणि झोडा‘ धोरणाचा उल्लेख करणे, राखीव जागांच्या धोरणामुळे हे घडते असे सांगणे, झोपडपट्टी वाढल्याने दंगेधोपे घडतात असे प्रतिपादन करणे आणि नेहरूंच्या औद्योगिक धोरणाचा संदर्भ निकालात देणे, हे सगळेच अनुचित वाटणारे आहे. मानवाधिकार आयोगानेच आता हे प्रकरण निस्तरायला हवे आहे. अहमदाबादेत, बडोद्यात आणि अन्यत्र जाळपोळ करणाऱ्यांत, लुटालूट करणाऱ्यांत सुशिक्षित गुंडही होते. त्या होळीत अनेकांनी आपले हात धुऊन घेतले, ही वस्तुस्थिती आहे. अशाच पद्धतीने जर दंगलींची प्रकरणे यापुढे निकालात काढली जाणार असतील तर दंगली घडवणाऱ्या राक्षसांचेच फावणार आहे. झहिराने केलेल्या स्फोटातून आपण काही शिकलो नाही तर मात्र न्यायदानाची सारी यंत्रणाच धोक्यात येईल.